**बृहन्मुंबई महानगरपालिका**

फॅक्स नं. ०२२-२४०३१२०२ ईमेल : stenodeanl@gmail.com फोन नं.: ०२२-४०६३००१/०२

# लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई-२२.

**क्र.लोटिरु./०१०९/अधिष्ठाता, दिनांक- ०४.०६.२०२१.**

## जाहिरात

कोविड-१९ या साथीच्या रोगाच्या तिसऱ्या लाटेकरिता विविध Jumbo Centres करिता डॉक्टर्स व परिचारिकांच्या नेमणुका करावयाच्या असून त्याकरिता वरिष्ठ वैद्यकीय सल्लागार, साहाय्यक वैद्यकीय अधिकारी, अधिपरिचारिका यांची फक्त तीन महिन्यांकरिता कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील अर्ज महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी अर्जासोबत इतर माहिती व शैक्षणिक प्रमाणपत्र खाली दिलेल्या ई-मेलवर पाठविण्यात यावी.

सदर अर्ज दि. २६.०६.२०२१ पर्यंत प्रमाणपत्रांसह संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत covid19mcgm@gmail.com / stenodeanl@gmail.com या ई-मेलवर ईमेल करण्यात यावेत.

### कंत्राटी पदे-तीन महिन्यांकरिता

| अ. क्र. | संवर्ग | एकूण पदे | निश्चित ठोक प्रति माह वेतन |
|---|---|---|---|
| १. | वरिष्ठ वैद्यकीय सल्लागार, इंटेंस्टिव्हिस्ट (एमडी मेडिसिन-१५)<br>ॲनेस्थेटिस्ट- (एमडी-१०), नेफ्रॉलॉजिस्ट (डीएम-३), कार्डिओलॉजिस्ट- (डीएम-१), न्युरोलॉजिस्ट- (डीएम-१) | ५० ते ७० | रुपये १.५ लाख एमडी उमेदवारांकरिता<br>व<br>रुपये २.०० लाख डीएम उमेदवारांकरिता |
| २. | साहाय्यक वैद्यकीय अधिकारी -<br>MBBS-<br>BAMS-<br>BHMS- | ९०० ते १००० | रु. ८०,०००/- (MBBS)<br>रु. ६०,०००/- (BAMS)<br>रु. ५०,०००/- (BHMS) |
| ३. | प्रशिक्षित अधिपरिचारिका | ९०० ते १००० | रु. ३०,०००/- |

**शैक्षणिक अर्हता :-**

१. वरिष्ठ वैद्यकीय सल्लागार, इंटेंस्टिव्हिस्ट (एमडी मेडिसिन) ॲनेस्थेटिस्ट- (एमडी) नेफ्रॉलॉजिस्ट (डीएम, कार्डिओलॉजिस्ट- (डीएम) न्युरोलॉजिस्ट- (डीएम) :-
   १. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधारक/अतिविशेषकृत शाखेचा पदवीधारक असावा.
   २. उमेदवार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल अथवा भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा नोंदणीकृत असावा.

२. साहाय्यक वैद्यकीय अधिकारी - MBBS, BAMS, BHMS
   १. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधारक शाखेचा पदवीधारक असावा.
   २. उमेदवार महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल/भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा अथवा योग्य संस्थेचा (आयुर्वेद व होमिओपथिक संस्थेचा) नोंदणीकृत असावा.

**३. प्रशिक्षित अधिपरिचारिका :**
   १. उमेदवार बारावी पास व जीएनएम मान्यताप्राप्त नर्सिंग कौन्सिलचा पदविकाधारक असावा/असावी.
   २. उमेदवार योग्य त्या नर्सिंग काऊन्सिलचा नोंदणीकृत असावा.

**वयोमर्यादा :**

उमेदवाराचे वय दि. ०१.०६.२०२१ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. अर्जासोबत जन्माचा दाखला/तत्सम प्रमाणपत्र सादर करावे.

**सर्वसाधारण अटी -**

१. उमेदवारांनी विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करू शकतात.
२. उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी/न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/शिक्षा झालेली असल्यास उमेदवाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
३. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
४. उमेदवार नोकरी करीत असल्यास पूर्वीच्या नियोक्त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
५. प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड प्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना आहेत.
६. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.
७. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये १००/- किंवा विधि आकाराप्रमाणे (वेतन मिळकतीनुसार) बॉण्डपेपरवर विहित नमुन्यातील कंत्राट करार करणे आवश्यक असून सदरहू खर्च संबंधित उमेदवारास करावा लागेल.
८. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकांची नियुक्ती कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.
९. सदर कंत्राटी तत्वावरील पदधारकाच्या नियुक्ती कालावधीमध्ये उमेदवाराने शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
१०. कुठल्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने ३० दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.

**विशेष सूचना :**

**अ) तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**
**ब) टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.**
**क) मुलाखतीच्या वेळी आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतीसह साक्षांकित छायांकित प्रतीसह उपस्थित राहावे.**
**ड) उमेदवारास पूर्वानुभव असल्यास त्याच्या प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतीसह साक्षांकित छायांकित प्रतीसह मुलाखतीस उपस्थित राहावे.**
**इ) मुलाखतीचे स्थळ : मागाहून कळविण्यात येईल.**

खाली नमूद केलेल्या तक्त्यामध्ये आपली माहिती भरून covid19mcgm@gmail.com / stenodeanl@gmail.com या ई-मेलवर पाठवावेत. सदर बाबतीतील कुठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही.

| अ.क्र. | नाव | शैक्षणिक पात्रता | पद | वय | राहण्याचे ठिकाण | भ्रमणध्वनी | ईमेल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

सोबत- १. शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र,
२. आधार कार्ड,
३. पॅन कार्ड,
४. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल/भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा अथवा योग्य संस्थेचा (आयुर्वेद व होमिओपथिक संस्थेचा)/नर्सिंग काऊन्सिल संस्थेचे नोंदणीकृत प्रमाणपत्र.

सही/-
**(डॉ. मोहन जोशी)**
**अधिष्ठाता**
**लो.टि.म.स. रुग्णालय, शीव**
**मुंबई-४०० ०२२.**

सही/-
**(डॉ. रमेश भारमल)**
**संचालक, (वै.शि. व प्र.रु.)**
**अधिष्ठाता**
**टो.रा.वै. महाविद्यालय**

**जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.**

पीआरओ/५१४/एडीव्ही/२०२१-२२